गद्यपाठ ९

ठळक मुद्दे

- **पाठाचे नाव**: बडोद्याचे चित्रसंग्रहालय . लेखक: निंबाजीराव पवार
- **प्रमुख व्यक्ती**: सयाजीराव गायकवाड , राजा रविवर्मा, सर टी माधवराव
- **व्यक्ती विशेष –**
    - ✓ **सयाजीराव गायकवाड**: गुणग्राहक, कलाप्रेमी, कलेला व कलाकारांना आश्रय देणारे, ललितकलांना प्रोत्साहन देणारे, देशोदेशीच्या निवडक चित्रांना भारतीय लोकांच्या समोर आणणारे, पाश्चात्य व भारतीय चित्रकलेचे अभ्यासक,भारतीय संस्कृतीचा ठेवा चित्रांच्या मार्फत जतन व्हावा म्हणून प्रयत्न करणारे, कलोपासक
    - ✓ **राजा रविवर्मा:** १९व्या शतकाच्या अखेरीस उदयाला आलेला प्रमुख भारतीय चित्रकार,भारतीय पुराणकथांमधील प्रसंगांची हुबेहूब चित्र काढणारा, पाश्चिमात्य चित्रशैलीचा अभ्यास करून भारतीय चित्रकलेत तिचा वापर करणारा, तैलरंगात चित्रे काढणारा चित्रकार, महाराष्ट्रीयन स्त्रियांची पेहराव पद्धती पौराणिक व्यक्तीरेखांसाठी वापर करणारा,सप्तरंगी चित्रे छापण्याचे काम सुरु करणारा,सामान्य माणसांना चित्र पाहता यावी म्हणून बडोद्यात चित्र प्रदर्शन भरवायला लावणारा,
    - ✓ **सर टी माधवराव :** महराजांचे दिवाण, चित्रकलेतील जाणकार, राजा रवीवर्मांना बडोद्यास आणायचा महाराजांना सल्ला देणारे.
- **बडोद्याचे चित्रसंग्रहालय**: पौर्वात्य आणि पाश्चिमात्य चित्रांचा संग्रह, राजा रविवार्म्यांच्या महत्त्वाच्या चित्रांचा संग्रह, भारत देशातील एक महत्त्वाचे संग्रहालय

**प्रस्तावना:**

देशाची संस्कृती म्हणजे काय असा विचार केला तर -एखाद्या देशात राहणारे लोक,त्यांचे राहणीमान, त्या देशाचा इतिहास, देशातील विविध परंपरा, आचार-विचार, रूढी, समजुती म्हणजे संस्कृती असे म्हणता येईल.माणसाची ओळख तो जिथे वाढतो त्या समाजाच्या व परिसराच्या संस्कृतीतून होत असते. देशांतर्गत अगदी प्रांताप्रांताची ओळखही त्या त्या प्रातांच्या वैशिष्ट्यामुळे होते. उदा. मराठी समाज आणि संस्कृतीची ओळख कशातून होते? तर महाराष्ट्रातील लोकांचे कपडे, महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ, विविध बोली तसेच येथील प्राचीन संतसाहित्य, महाराष्ट्रातील कोरीव लेणी, चित्रकला,संगीत, नृत्य, नाट्य अशा अनेक उदाहरणांतून होते. म्हणजेच, कला आणि कलाकार देशाची सांस्कृतिक ओळख जपत असतात.

मात्र,कलाकारांच्या कलेचे कौतुकच नाही झाले, तर काय होईल? देशाची, प्रांताची विशिष्ट ओळख तयार होणार नाही. म्हणूनच ही ओळख जपण्यासाठी कलाकारांप्रमाणेच कलेचे चाहते, रसिक व आश्रयदाते आवश्यक असतात. कलेचे मोल तिची प्रशंसा करण्यात व बढावा देण्यात असते. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड ह्यांनी त्यांच्या कारकिर्दीत कलेला प्रोत्साहन देण्याचे, जतन करण्याचे व प्रसार करण्याचे मोठे काम केले. बडोद्याचे चित्रसंग्रहालय हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. भारतातील चित्रकार व पाश्चात्य देशातील चित्रकारांची उत्तमोत्तम चित्रे सयाजीराव महाराजांनी जमवली आणि लोकांनी व अभ्यासकांनी पहावी म्हणून एकत्र ठेवली.

'बडोद्याचे चित्रसंग्रहालय' हा पाठ सयाजीराव गायकवाडांची कलादृष्टी व राजा रविवर्मा यांची अभ्यासपूर्ण चित्रकलेची ओळख आपल्याला करून देतो.

**पाठाचा आशय**

सयाजीराव गायकवाड महाराजांना चित्रांची आवड होती. भारतीय व युरोपीय चित्रकलेच्या तुलनेचा ध्यास, युरोपच्या प्रवासात त्यांना लागला. त्यातूनच पुढे चित्रसंग्रहालय काढण्याचे त्यांनी मनोरथ रचले. परदेशी हिंडताना बायबल आणि ग्रीक पुराणातील कथा ह्यांवर आधारलेली, श्रेष्ठ चित्रकारांनी काढलेली चित्रे त्यांनी पाहिली होती. त्याच धर्तीवर भारतीय संस्कृतीचा ठेवा असलेले रामायण आणि महाभारत ह्यांतील प्रसंगांवर आधारित चित्रे कोणी काढू शकले तर भारतीय चित्रकलेच्या क्षेत्रात हे मोठे काम ठरेल असे त्यांना वाटले. शिवाय भारताचा सांस्कृतिक ठेवा चित्रांच्या रूपानेही जतन होऊ शकेल असाही विचार त्यामागे होता.. ह्या संदर्भात त्यांचा कलाकाराचा शोध चालू होता.

हा शोध संपला जेव्हा टी. माधवराव ह्या त्यांच्या दिवाणजींनी राजा रविवार्मांचे नाव सुचवले. टी. माधवरावांनी राजा रविवर्मांची चित्रे मद्रास येथील प्रदर्शनातून सयाजीरावांसाठी विकत घेतली होती. त्यातील एक चित्र दुष्यंताला पत्र लिहिणारी शकुंतला हिचे होते.

राजा रविवर्मा हे चित्रातील अचूकता, जिवंतपणा दाखवण्यात कुशल होते. माधवरावांच्या सल्ल्यावरून सयाजीरावांनी त्यांना बडोद्यास बोलावले व रामायण-महाभारतातील प्रसंगांवर आधारित चित्र तयार करण्याची विनंती केली. राजा रविवर्मा हे हाडाचे चित्रकार जरी असले तरी त्यांची वृत्ती अभ्यासकाची होती. पुराणातील चित्रे रंगवण्यासाठी त्याकाळातील रीतिरिवाज, वेशपद्धती, रंगसंगती ह्यासर्वांचा सूक्ष्म अभ्यास

करणे त्यांना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यानी भारतभर प्रवास केला. त्यानंतर दोन वर्ष त्यांचा बडोद्यास मुक्काम होता.

**राजा रविवर्मा**

एकीकडे भारतातील विविध राज्यातील संस्कृती, राहणीमान, वेशभूषा, शिल्प ह्यांचा अभ्यास केला तर दुसरीकडे राजा रविवार्मांनी पाश्चात्य शैलीचाही अभ्यास केला. सयाजीरावांची अपेक्षा राजाजींना माहीत असल्यामुळे भारतीय व पाश्चात्य ह्या दोन्ही शैलींचा मिलाफ त्यांना करायचा होता. चित्रात जिवंतपणा येण्यासाठी व चित्रातील व्यक्तिरेखेच्या चेहऱ्यावरील भाव सजीव करण्यासाठी ते प्रत्यक्ष व्यक्तींना उभे करायचे. इतकेच नाही तर विविध भाव-भावनांचे चित्रण नेमकेपणाने होण्यासाठी, स्वत:च्या चेहऱ्यावर ते भाव आणून, आरशात निरीक्षण करीत.सर्वप्रकारचे भाव ते चित्रात आणू शकत. समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील अचूक भाव टिपण्यापासून त्यांनी नेसलेल्या वस्त्रांवरील बारीक चुण्या-सुरकुत्या टिपण्यापर्यंत सर्व बारकावे रविवर्मा आपल्या चित्रात आणत. अशा विविध प्रयोग-प्रयत्नांतून त्यांनी साकारलेली राधा-कृष्ण, मेनका-विश्वामित्र, नल-दमयंती, गंगावतरण ही चित्रे अतिशय सुंदर वठली व प्रसिद्धही  झाली. अशा ह्या मेहनती व अभ्यासू चित्रकाराला , त्यांचे काम पूर्ण झाल्यावर,सयाजीराव गायकवाडांनी मानवस्त्र, पन्नास हजार रुपये (त्या काळाचे) मानधन व युरोपातून खास मागविलेले चित्रकलेचे भारी किमतीचे साहित्य, रंग व कुंचले देऊन सत्कार केला. शिवाय ‘ तुम्ही चित्रकारांतील युवराज आणि युवराजातील चित्रकार आहात’ असे पत्र लिहून वाहवा केली.

**रविवर्मांचे योगदान**

राजा रविवर्मा १९व्या शतकातील, भारतीय चित्रकलेतील महत्त्वाचे नाव आहे. ह्यामागे त्यांची शैली तर आहेच परंतु त्यांनी असेही काही बदल चित्रकलेत आणले ज्यामुळे त्यांचे नाव अजरामर झाले. त्यातील पहिले कारण म्हणजे पाश्चात्य शैलीला आपल्या चित्रशैलीत त्यांनी आणले. दुसरे म्हणजे तैलरंगातून चित्रण करणारे आद्य भारतीय चित्रकार समजले जातात. सीता, लक्ष्मी, द्रौपदी ह्यांसारख्या पौराणिक देवतांना व व्यक्तींना नऊवारी साडी व साधी चोळी अशा पोशाखात रंगवले. ह्याशिवाय त्यांनी काढलेली चित्रे सर्वसामान्यांच्या घराघरात जावी ह्यासाठी त्यांनी तैलचित्र (ओलिओग्राफीक) छापखाना काढला. ज्यामुळे लहान-मोठ्या आकारातील चित्रांच्या असंख्य प्रतिकृती काढणे शक्य झाले. ज्याच्या प्रसारामुळे लोकांमध्ये चित्र पाहण्याची दृष्टी निर्माण होईल असे त्यांना वाटत होते.

अशा ह्या चित्रकाराची चित्रे सयाजीराव गायकवाड यांनी बडोद्याच्या चित्रसंग्रहालयात बनवून घेतली ज्यांनी आपल्या देशाची सांस्कृतिक प्रतिमा उंचावली.

**सयाजीरावांचे मोठेपण**

अन्न, वस्त्र, निवरा ह्या गोष्टी आपल्या जगण्याची गरज भागवतात तसेच माणसाच्या मनातील भाव भावना व्यक्त  होण्याची गरज कला भागवतात. सयाजीराव कलेचे महत्त्व ओळखून होते ते ह्याच कारणाने. माणसाचे भावविश्व फुलवायचे असेल तर त्याला कला समजायला हवी, कलेतील सौंदर्य ओळखता यायला हवे. त्यासाठी

लोकांना विविध कला बघायला व अनुभवायला मिळायला हव्यात. ह्या हेतूनेच त्यानी चित्रसंग्रहालय निर्माण केले.

सयाजीराव हे कलेतील जाणकार होते. नुसते जाणकार नाहीत तर देश-परदेशात त्यांचे जाणे-येणे असल्यामुळे पाश्चात्य देशात कलेचे असलेले स्थान व तिला मिळालेला/ दिलेला दर्जा त्यांना माहीत होता. भारतीय चित्रकला आणि युरोपीय चित्रकलेचा सतत तौलनिक अभ्यास त्यांनी केला. त्यामुळे, भारतातील कलेच्याबाबतीत प्रयत्न कमी पडत आहेत हे त्यांना जाणवत होते. भारतीय चित्रकारांना व्यासपीठ मिळावे, भारतीय लोकांकडे चित्रकला पाहण्याची दृष्टी निर्माण व्हावी शिवाय, पौर्वात्य व पाश्चिमात्य चित्रकलेचा तौलनिक अभ्यास अभ्यासकांना करता यावा अशा विचारांमधून बडोद्याच्या चित्रसंग्रहालयाची स्थापना झाली. अशाप्रकारे चित्रकलेच्या शिक्षणाची त्यानी सोय करून ठेवली.

राजा रविवर्मा, सयाजीराव गायकवाड यांच्याविषयी अधिक वाचन करण्यासाठी पुढील लिंक्स पहा-

http://marathivishwakosh.in/khandas/khand14/index.php?option=com_content&view=article&id=10235

https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand4/index.php/khand4-suchi/23-2015-01-28-09-35-50/7682-2012-01-19-08-14-40

**<u>उजळणी प्रश्न:</u>**

अ) पुढील प्रश्नांच्या आधारे धड्याचा विचार करा व ३० ते ४० शब्दांत उतरे द्या.

१) सयाजीराव गायकवाड यांनी कशाचा तौलनिक अभ्यास केला व का?

२) राजा रविवर्मा यांनी भारतभर प्रवास का केला?

३) रविवर्मांच्या चित्रशैलीचे वैशिष्ट्य काय होते?

ब) पुढील प्रश्नाच्या आधारे धड्याचा विचार करा व ५० ते ६० शब्दांत उत्तरे द्या.

१) चित्रकलेच्या अभ्यासाच्या दृष्टीने बडोद्याच्या चित्रसंग्रहालयाचे वैशिष्ट्य सांगा.

२) ‘ तुम्ही चित्रकारांतील युवराज आणि युवराजातील चित्रकार आहात’ असे सयाजीराव का म्हणतात?

३) ललितकला राष्ट्राला चैतन्य देतात हे महाराजांचे विचार सोदाहरण स्पष्ट करा.

क) संदर्भासहित स्पष्टीकरण द्या:

१) ‘माणसाचे भावविश्व फुलवायचे असेल, जीवन संपन्न करायचे असेल तर साहित्य,शिल्प,नृत्य, संगीत या कालानाही प्रोत्साहन देणे आवश्यक आहे’

२) ‘तुमच्या कलाकृतींनी भारतीयांना चित्र पहायची सवय तुम्ही लावता आहात, याचा आम्हाला आनंद वाटतो.’

**<u>मुक्त प्रश्न</u>**

१) पुढील चित्रांचे निरीक्षण करा व तुम्हाला जाणवलेले वैशिष्ट्य मुद्दे रूपाने लिहून काढा. चित्र कसे पहायचे ह्या टिपणाचा आधार घ्या

२) कला संग्रहालयाची झलक पाहण्यासाठी पुढील लिंक पहा.

http://en.wikipedia.org/wiki/National_Gallery_of_Art